नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.३२०**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १२ याची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नांव - सुपडा नारायण पाटील,
वय - ६४ वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. - कुंड बु., ता. मलकापुर जि.बुलडाणा

**सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....**

०१. माझी शेती कुंड बु. येथे असून ती दीड एकर शेती आहे. सन २०२२ मध्ये मी माझे शेतात कापूस पेरला होता. तो कापूस २२ क्वींटर ९० किलो झाला होता. तो कापूस मी राजेश पाडुरंग पाटील व शरद विष्णु बोरले यांच्यामार्फत जगन नारखेडे याला विकला होता. तो व्यवहार नगदी असेल तर सात हजार व एका महिन्याने व चेकचा असेल तर नऊ हजार असा ठरला होता व तसे मला राजेश पाटील याने सांगितले होते. तो भाव कापसाचा होता. मी राजेश पाटील याला पूर्वी पासून ओळखतो तो माझ्या शेजारी राहतो. तो कापूस मी जगन नारखेडे याला दिला. तो कापूस ०४ ऑगस्ट २०२२-२३ च्या हंगामात दिला होता. तो कापूस मी मोजून दिला होता. तो कापूस काट्यावर काट्यावाल्याने मोजला असून त्यावेळी शदर बोरले हजर होता. तो कापूस २२ क्वींटल ९० किलो भरला. त्या कापसाचे २,०६,१००/- इतके रूपये झाले. ते पैसे मला मिळाले नाही. ते पैसे न मिळाल्यामुळे मी फिर्याद केली. फिर्याद मी मलकापुर ग्रामीण पोलीस स्टेशनला केली. त्यांना मी माझ्या धनादेशाची छायांकित प्रत दिली होती. तो चेक कपासीचा होता. तो धनादेश मला राजेश पाडुरंग पाटील याच्यामार्फत मला मिळाला. आता मला धनादेशाची अस्सल दाखविण्यात आली. त्यास **निशाणी क्र.३२१** देण्यात येते. आरोपी क्र.२ व ३ आज न्यायालात हजर असून त्यांना मी ओळखतो. आरोपी क्र.१ ला मी ओळखत नाही. त्याला मी पाहीले देखील नाही.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास- आरोपी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.एन.सी.जाधव यांचेमार्फत सुरु....**

०२. मी सरतपासात सांगितलेला व्यवहार हा आरोपी क्र.२ राजेश पाटील व शरद

बोरले यांच्याशीच झाला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ शी मला कधी बोलायचे व पाहायचे काम पडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, जो धनादेश मी दाखल केला तो राजेश पाटील याने दिल्याचे मी खोटे सांगत आहे. मी धनादेश अनादरीत झाल्यानंतर कोणतीही दिवाणी व फौजदारी कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी असा कोणताही कापूस विकला नसल्यामुळे माझे पैसे निघत नाहीत आणि त्यामुळे मी कोणतीही कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर मी खोटा सांगत आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....**

०३. माझे शिक्षक मॅट्रीकपर्यंत झाले आहे. मला इंग्रजी वाचता येते व मराठी लिहीता, वाचता व बोलता येते. मी फिर्याद कोणत्या तारखेला दिली ती तारिख मला आठवत नाही. पोलीसांनी माझे बयाण एकच वेळा घेतले. ते बयाण कधी घेतले हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जे काणी बयाण घेतले ते मलकापुर ग्रामीण पोलीस स्टेशन यांनी घेतले. मी पोलीसांना बयाण देतेवेळी तो व्यवहार नगदी असेल तर सात हजार व एका महिन्याने व चेकचा असेल तर नऊ हजार असा ठरला होता व तसे मला राजेश पाटील याने सांगितले होते हे मी पोलीसांना सांगितले होते. सदर बाब माझ्या बयाणात का नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

०४. मी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुध्द गुन्हा दाखल झाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी पोलीसांनी माझे बयाण घेतले होते त्याच दिवशी मी धनादेशाची छायांकित प्रत त्यांना दिली होती. मी पोलीसांना बयाण देते वेळी तो चेक कपासीचा होता, तो धनादेश मला राजेश पाडुरंग पाटील याच्यामार्फत मला मिळाला सांगितले होते. सदर बाब माझ्या बयाणात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

०५. तथाकथीत रक्कम ही मला जगन नारखेडे यांच्याकडून घेणे होती व ती रक्कम २,०६,१००/- घेणे होती या व्यतिरिक्त मला इतर कोणतीही रक्कम घेणे नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, २,०७,०००/- ही रक्कम मला आरोपी क्र.१ ते ३ यांच्याकडून कधीही घेणे नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर कापूस हा मी जगन नारखेडे याला विकला होता. कापूस मोजण्याचे साहित्य गाडीमधील लोक घेवून आले होते. हे म्हणणे खरे आहे की, एकावेळी त्या

तोलकाट्याची क्षमता ५० किलोपर्यंत मोजता येते. हे म्हणणे खरे आहे की, कापसाचे वेगवेगळे भार किंवा तोल करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, कापूस २२ क्वींटल असल्यामुळे जास्त तोल होतात. हे म्हणणे खरे मापारी हा कापूस मोजल्याच्या प्रत्येक नोंदी ठेवत असतो. हे म्हणणे खरे आहे की, माझा कापूस मोजतेवेळी देखील तशा नोंदी ठेवल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक वेळी त्याची बेरीज करून कापूस मोजल्यानंतर त्यावर कापूस विक्रत्याची व खरेदीदाराची सह्या घेतल्या जातात. तसेच त्यावर दलाल व मध्यस्थीची सही देखील घेतली जाते. सदर तथाकथीत व्यवहारात मी सह्या केल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, माझा व जगन नारखेडेच्या व्यवहाराशी राजेश पाटील व शरद बोरले यांचा काहीही संबंध नव्हता. मी आरोपी क्र.२ व ३ मार्फत आरोपी क्र.१ ला कापूस दिल्याचा माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही.

०६. अतुल वासुदेव पाटील व अतुल मधुकर पाटील हे माझे शेजारी आहेत. त्यांचे माझ्याशी चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अतुल मधुकर पाटील हे माझ्यासोबत न्यायालयात हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी मला कोर्टात कशी साक्ष द्यायची याबाबत मार्गदर्शन केले. हे म्हणणे खरे नाही की, मी अतुल मधुकर पाटील यांच्या सांगण्यावरून आजरोजी खोटी साक्ष दिली. मी दाखल केलेल्या धनादेशावर आरोपी क्र.२ व ३ चे नाव व सह्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, जो धनादेश मी आज दाखल केला तो मला आरोपी क्र.१ ने दिला. साक्षीदार परत स्वतःहून सांगतो की, तो धनादेश मला राजेश पाटील व शरद बोरले यांच्यामार्फत दिला. हे म्हणणे खरे नाही की, मी ग्रामीण पोलीस स्टेशन मलकापुर येथे दिलेली तक्रार फक्त आरोपी क्र.१ जगन नारखेडे याच्याविरुध्द दिली. मी पोलीसांनी कार्यवाही न केल्यामुळे त्यांच्या वरिष्ठांकडे तक्रार केली नाही. मी सदर व्यवहाराच्या अनुषंगाने आरोपी क्र.२ व ३ यांच्या विरुध्द दिवाणी व फौजदारी प्रकरण न्यायालयात दाखल केले नाही.

०७. हे म्हणणे खरे आहे की, राजेश पांडुरंग पाटील यांचा हॉटेलचा व्यवसाय असून पूर्णवेळ ते तेथेच काम करतात. हे म्हणणे खरे आहे की, अतुल मधुकर पाटील हे ग्रामपंचायत निवडणुकीला सतत उभे राहतात व ते आजही सदस्य आहेत. हे म्हणणे खरे नाही की, राजेश पाटील हा अतुल मधुकर पाटीलच्या विरुध्द असलेल्या बाजूने मदत करतो. हे म्हणणे खरे आहे की, शरद विष्णु बोरले हे राजेश पाटील यांच्या पत्नीचे भाऊ आहेत. जगन नारखेडे व

शरद हे एकाच गावचे रहिवासी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, म्हणून मी जगन नारखेडे यांच्याशी संबंध जोडण्याकरिता आरोपी क्र.२ व ३ चे नाव या गुन्हयात टाकले. हे म्हणणे खरे नाही की, अतुल मधुकर पाटील यांना यांच्या पक्षाला ग्रामपंचायत निवडणूकीत मदत व्हावी व वैमन्सयातून त्यांना मदत व्हावी म्हणून त्यांच्या सांगण्यावरून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

०८. हे म्हणणे खरे नाही की, मी राजेश पाटील व शरद बोरले यांच्यामार्फत कापूस जगन नारखेडेला विकल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, धनादेश मला आरोपी क्र.१ जगन रामचंद्र नारखेडे याने दिल्याचे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो धनादेश त्याने खरेदी केलेल्या कापसाच्या व्यवहाराबाबत होता.

**उलटतपास पूर्ण.**

**उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....**

०९. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....**

१०. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला..

**उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....**

११. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.मराठे यांचेमार्फत सुरु....**

१२. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....**

१३. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.११ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एस. जगताप यांचेमार्फत सुरु....**

१४. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.१२ तर्फे विधीज्ञ श्रीमती आर.डी.संचेती यांचेमार्फत सुरु....**

१५. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.०४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांचेमार्फत सुरु....</u>**

१६. आरोपी क्र.१ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.10.15 17:38:55 +0530

दिनांक : १५/१०/२०२५.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर